Scanned by CamScanner

प्रपत्र : १ - अ

पहिली खबर

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये) 174

१. जिल्हा : नंदुरबार पोलीस ठाणे : शहर पो.स्टे. वर्ष : २०१९

पहिली खबर क्र. : २०८/२०१९ तारीख : २९/१०/२०१९

२. अ) अधिनियम क्र.प्र.क. कलम कलमे ७प्रमाणे

ब) अधिनियम महाराष्ट्र पोलीस कलमे

क) अधिनियम २००८ चे कलमे

ड) अधिनियम कलमे

३. अ) अपराधाची घटनेचा वार : दि. २१/१०/२०१९ ते दि. ३१/१०/२०१९

वेळेचा अवधी वा. पासून २१।१५ ते २९।५५ पर्यंत

ब) पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख २९/१०/२०१९ वेळ १४।४०

क) सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्र. २८ वेळ १४।४०

४. माहितीचा प्रकार लेखी/तोंडी

५. घटनेचे ठिकाण उप प्रादेशिक कार्यालय संजय नगर नंदुरबार स.नं. नंदुरबार

अ) पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर गस्तक्षेत्र क्र.

ब) पत्ता

क) या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नांव .

पोलीस ठाणे जिल्हा

६. तक्रारदार/खबरी :

अ) नांव : बलवीरसिंग चिंता वसावे

ब) पित्याचे/पतीचे नांव : चिंता वसावे

क) जन्म तारीख/वर्ष : ५८ वर्षे राष्ट्रीयत्व : भारतीय

ड) पारपत्र क्र. : दिल्याची तारीख : दिल्याचे ठिकाण :

इ) व्यवसाय : सेवानिवृत्त, पूर्वी कुलिंग इन्हा. अधिकारी विक्रम मेणासर्व, नंदुरबार

ई) पत्ता : रो. हाउस नं. निवास दि. तापी गुरुकुल) मो. ९०९६२८५१९०

प्रपत्र : १ - ब

७. माहित असलेल्या/संशयित/माहित नसलेल्या आरोपीचा संपूर्ण तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.)

१) श्रीमती किरण बाळू गडे उप प्रादेशिक व्यवस्थापक व लोकसेवक २) श्री संतोष महादू सावंत वैद्यकीय अधिकारी उपप्रादेशिक कार्यालय नंदुरबार.

संशयितांची शारीरीक ठेवण, व्यंग आणि इतर तपशिल :-

लिंग	जन्मतारीख /वर्ष	बांधा	उंची (सेंमी/फूट)	वर्ण	ओळख	व्यंग/वैशिष्ट्ये	दात	केस
१	२	३	४	५	६	७	८	९

डोळे	सवयी	पोशाखाच्या सवयी	भाषा/ बोली भाषा	भाजल्याची खुण	कोड	तीळ	व्रण	गोंदण
१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८

जर तक्रारदार/खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावे. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी. या अनुशंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीतांचा इतर गुन्ह्यांतील संहभाग स्पष्ट करेल. वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुन:श्च तयार करावी.

८. तक्रारदाराने/खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :

९. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडवा)

१) फाडली केलली बाचेकी रेकडा/- २५,०००/- रुपये रुपये २५,०००/- रु. सुनेयानच्या नावाने चेकचे.

२) रतनाबाईची रेकडा - २५,००१/- रुपये.

प्रपत्र : १ - क

१०. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

११. मरणान्वेषण अहवाल/यु.डी. प्रकरण क्र. जर असल्यास :

१२. पहिल्या खबरीतील हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावेत.)

यातील मुळ तक्रारदार हे दिनांक ३०/११/२०१८ रोजी वयोनियमानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. त्याचे सेवानिवृत्त पुर्वी महाराष्ट्र शासनने गट "क" व "ड" (वर्ग ३ व ४) कर्मचाऱ्यांना "सुधारीत सेवा अंतर्गत प्रगती योजना" या नावाने दिनांक ०१/१०/२००६ पासून शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्रमांक अस्था/२०१२/प्रक्र/२९४/का.१५ दिनांक १७/०१/२०१४ अन्वये महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना सदर योजना लागू केलेली आहे.

सदर योजनेअंतर्गत तक्रारदार यांचे वेतनवाढ व फरकासहित एकूण ११४२८०५/- रक्कम रुपये शासनाने मंजूर केली असून सदर रक्कम मिळणेकामी त्यानी शासनास पत्रव्यवहार केला असता सदर प्रकरण हे वृत्तीवर आदिवासी विकास महामंडळ, नंदुरबार यांकेडेस आलेले होते. व सदर प्रकरणाचे काम हे तेथील अधिकारी श्रीमती किरण बाळु गाडे उपप्रादेशिक व्यवस्थापक, उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार व संतोष बहादुर आमटे लेखापाल यांकेडेस आहे.

तक्रारदार यांचे आरवासित प्रगती योजना व वेतनवाढ फरकावी रक्कम ११४२८०५/- रुपये रकमेचा फरक मिळणेकामी शासनास वृटी पुर्तता अहवाल पाठविणेकामी तक्रारदार हे वरील अधिकारी व कर्मचारी यांना वेळोवेळी भेटले असता त्यानी त्यांचेकडून सदर वृटी पुर्तता अहवाल पाठविणेसाठी प्रत्येकी २००००/- रुपये लाचेची मागणी करुन पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लोकसेविका १) श्रीमती किरण बाळु गाडे यांनी २५,०००/-रुपये रोखीने व २)संतोष बहादुर आमटे यांनी युनियनच्या नावाने चेकने २५,०००/-रुपये लाचेची मागणी पंच साक्षीदारांसमक्ष केली होती. त्यांनी मागणी लाचेची रक्कम मुळ तक्रारदार हे देण्यास गेले असता वरील आलोसे यांनी स्विकारण्यास टाळाटाळ केली. असून त्यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने तक्रारदार यांचेकडे त्यांचे व त्यांचे मित्राचे कामासाठी लाचेची मागणी केली म्हणून वरुन गुन्हा.

१३. केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरुन दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले. अन्वेषण अधिकारी श्रीमान पोनि/सपोनि/पोउनि/सपोउनि/पोहेकॉ/पोना/पोकॉ/चापोकॉ/ श्री. प्र.प. अहिरराव यांना तपास काम हाती घेण्याचा निर्देश दिला/तपास करण्याचे नाकारले/अधिकारितेच्या मुद्दयास पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.

पहिली खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला/खबरील प्रत मोफत दिली. :

अ) चार्ज सिट/फायनल नंबर: कोर्टाचा नंबर:

१४. कोर्टाचा निकाल :

व्हिलेज क्राईम नोट बुक क्र. :

१५. तक्रारदाराची सही/अंगठा

पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही

नांव देवेंद्रनाथ फुलपगारे

पदनाम पो.हे.कॉ. क्रमांक ८२६

१६. कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ :

दि.२६/०६/२०१९

मी सरस्वतीबेन विष्णा वसावे वय ५८ वर्षे,धंदा सेवानिवृत्त कनिष्ठ सस. आदिवासी विकास महामंडळ नंदुरबार रा. आडवा ता. निझर जि. तापी (गुजरात)

मो.न.९८१६२२६५१७.

समक्ष कार्यालयात हजर होवून फिर्याद लिहून देतो की, मी वरील ठिकाणी राहत असून सन १९८३ मध्ये आदिवासी विकास महामंडळ नंदुरबार येथे शिपाई म्हणून नोकरीस लागलो होतो व त्यानंतर पदोन्नती होवून कनिष्ठ सहा. म्हणून नोकरी केली. व दिनांक ३०/११/२०१८ रोजी वयोनिवृत्तीनुसार सेवानिवृत्त झालेलो आहे.

मी दि.२२/०५/२०१९ रोजी मा श्री.जाधव सो. पोलीस उपअधीक्षक अॅ.क.व्युरो नंदुरबार यांचे कार्यालयात जावुन समक्ष भेटुन सांगितले की, "दोन शासकीय नोकर, माझेकडेस लावेली मागणी करीत असले त्यात माझी लाच देणेची इच्छा नाही तरी आपण त्यावेबर कारवाई करावी वावत सांगितले.

त्यानंतर आपण मा.तालुका कृषि अधिकारी सो.,नंदुरबार यांना पत्र देवुन त्यांचेकडुन दोनपंच मागणी केल्याने दोन पंच आपले कार्यालयात १०:३० वाजता हजर झाले त्यांना आपण त्यांचे नावगाव विचारता त्यांची त्याची नावे १.श्री.संदीप धुडकु दाणे, वय–३९, धंदा–नोकरी, कृषि सहायक, तालुका कृषि कार्यालय,नंदुरबार (वर्ग–३), रा.हरिभाऊ नगर,फ्लॉट नं१, नंदुरबार मुळ रा.फुले नगर,सटाणा जि.नाशिक मो. न ९४२३०८३४३५ २) श्री. पुष्कर मोहन वाघ, वय २८ वर्षे, धंदा–नोकरी, कनिष्ठ लिपीक, तालुका कृषि कार्यालय,नंदुरबार (वर्ग–३), रा.हरिभाऊ नगर,फ्लॉट नं१०६, नंदुरबार मुळ रा.म्हावी कॉलनी, देवपूर,धुळे मो.नं ८३०८२९२३३५असे सांगीतले तेव्हा आपण त्यांची माझी व स्टाफची ओळख करून दिली.

त्यानंतर आपण त्याना तक्रारीसंबधी विचारणा करणेबाबत सांगितले त्यांना मी माझे नावगाव सागून माझी तक्रारीची हकीगत सागितली की, मी वरील ठिकाणी राहत असून सन १९८३ मध्ये आदिवासी विकास महामंडळ नंदुरबार येथे शिपाई म्हणून नोकरीस लागलो होतो व त्यानंतर पदोन्नती होवून कनिष्ठ सहा. म्हणून नोकरी केली. व दिनांक ३०/११/२०१८ रोजी वयोनिवृत्तीनुसार सेवानिवृत्त झालेलो आहे.

माझा सेवानिवृत्त पुर्वी महाराष्ट्र शासनाने गट "क" व "ड" (वर्ग ३ व ४) कर्मचाऱ्यांना "सुधारीत सेवा अंतर्गत प्रगती योजना" यानावाने दिनांक ०१/१०/२००६ पासून शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्रमांक आश्रा/२०१२/प्र.क्र.२१४/का१५ दिनांक १७/०१/२०१४ अन्वये महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना सदर योजना लागु केलेली आहे.

सदर योजनेअंतर्गत माझा आश्वासित प्रगती योजना व वेतनवाढ फरकाने पगारपत्रक याची रक्कम मिळणेकामी मी शासनास वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला होता. त्याअनुषगाने मला वेतनवाढ व फरकासहित एकुण ११४२८०५/– रक्कम रुपये शासनाने मंजुर केली असुन सदर रक्कम मिळणेकामी मी शासनास पत्रव्यवहार केला असता सदर प्रकरण हे ट्रेझरि आदिवासी विकास महामंडळ, नंदुरबार यांचेकडेस आलेले आहेत. व सदर प्रकरणाचे काम हे तेथील अधिकारी श्रीमती किरण बाळु गाडे उपप्रादेशिक व्यवस्थापक, उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार व संतोष बहादुर आमटे लेखापाल यांचेकडेस आहे.

माझे आश्वासित प्रगती योजना व वेतनवाढ फरकाची रक्कम ११४२८०५/– रुपये रकमेचा फरक मिळणेकामी शासनास वृटी पुर्तता अहवाल पाठविणेकामी मी वरील अधिकारी व कर्मचारी याना वेळोवेळी भेटलो असता ते माझेकडुन सदर वृटी पुर्तता अहवाल पाठविणेसाठी प्रत्येकी २००००/– रुपये लाचेची मागणी करीत आहे माझी त्यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नाही. तरी त्यांचेवर कायदेशिर कारवाई होणेस विनती आहे. तसेच श्रीमती गाडे व श्री. आमटे यांचेत व माझेत कोणत्याही प्रकारचा देवाणघेवाणीचा व्यवहार अगर वाद नाही तरी त्यांचेवर कायदेशिर कारवाई होणेस विनती आहे. अशी तोंडी हकीगत सांगितल्यानंतर, आपण दोन्ही पंचांना आपणाकडे मी दिलेली हस्तलिखीत लिहीलेली तक्रार वाचावयास दिली. ती तक्रार दोन्ही पंचांनी वाचली. मी सांगितलेली तोंडी हकीगत आणि लेखी तक्रार ही तंतोतत असल्याची दोन्ही पंचांची खात्री झालेने त्या तक्रारीवर आपण व दोन्ही पंचांनी आपल्या सुचनेप्रमाणे सह्या केल्या. आपण दिलेल्या सूचनेनुसार सदर कारवाई दरम्यान पोना/चिन्ले यांनी फोटोग्राफी केली.

त्यानंतर आपण दोन्ही पंचाना व मला अॅ.क.व्यु मध्ये तक्रार आलेनंतरची क्रियाति व कार्यवाही बाबतचा क्रम पुन्हा समजावून सांगितला. लाचेचा सापळा कार्यवाही मध्ये सुरूवातीला पडताळणी करणे आवश्यक असल्याने आपण दिलेल्या सूचनेनुसार पपोना/ नावाडेकर यानी सोनी कपनीचा एक डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व सॅनडिस्क मायक्रो एस.डी.–८ जी.बी.चे एक सीलबद मेमरी कार्ड बाहेर काढून दोन्ही पंच व तक्रारदारासमक्ष हजर केले.

सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर कसे हाताळण्यात येते याची सविस्तर माहिती आपण मला व दोन्ही पंचांना दिली. त्यासोबतच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर हाताळणीचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानतर त्यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालवुन त्यामध्ये पूर्वीचे कसलेही रेकॉर्डींग नसल्याची दोन्ही पंचांची खात्री केली. त्यानंतर आपण वरील मेमरी कार्ड डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकून मेमरी कार्ड बर देखील पूर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत नसल्याची दोन्ही पंचांची व माझी खात्री करुन दिली. त्यानंतर आपण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून आपल्या ताब्यात ठेवला आहे.

त्यानंतर आपण,अॅ.क.व्युरो नंदुरबार कार्यालयातुन शासकीय वाहनाने १४.०० वाजता पंच व स्टाफसह रवाना होवुन नंदुरबार शहरात शिवाजी नाटयमंदिराजवळ वाहन उभे करून तेथुन आपण आपलेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टाचे आतील बनियानला लावून ते सुरु केले. ती वेळ १४:११ वाजेची होती. त्यानंतर मला श्रीमती गाढे व श्री. आमटे यांची भेट घेण्यासाठी पंच नं१ दाणे यांचेसह नंदुरबार शहरातील संजयनगर भागातील उपप्रादेशिक कार्यालय, येथे पायी–पायी रवाना केले.

[illegible] श्री दाणे हे आपण आपल्या ठिकाणी परत आले. तेव्हा आपण तक्रारदार याचे शर्टाचे आतील बनियानला लावलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करुन त्यांचे ताब्यात घेतले ती वेळ १५:२२ वाजेची होती.

त्यानंतर आपण पंच नं१ श्री.दाणे यांना पंच नं२ श्री.वाघ यांचेसमक्ष विचारले की, "आपणास व तक्रारदार अशांना अॅ.क.व्युरो नंदुरबार कार्यालयातुन श्रीमती गाढे व श्री. आमटे यांची भेट घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात रवाना केल्यापासून ते परत येईपावेतो काय काय घटना घडली? असे विचारता पंच नं१ यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार असे अॅ.क.व्युरो नंदुरबार कार्यालयातुन शासकीय वाहनाने निघुन नंदुरबार शहरात शिवाजी नाटयमंदिराजवळ वाहन उभे करून तेथुन मी व तक्रारदार वसावे असे पायी–पायी रवाना होवुन उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार या कार्यालयात तक्रारदार श्री.वसावे हे श्रीमती गाढे व श्री. आमटे यांची भेट घेण्यासाठी गेले असता लोकसेविका श्रीमती गाढे मॅडम व श्री. आमटे हे संजयनगर कार्यालयात मिळुन आल्या नाहीत परंतु लोकसेवक श्री.आमटे हे धुळेरोड येथील कार्यालयात असलेबाबत तक्रारदार श्री.वसावे याना समजल्याने तक्रारदार श्री. वसावे यांचे सोबत धुळेरोड येथील कार्यालयात गेलो असता त्याठिकाणी लोकसेवक श्री. आमटे हे मिळून आल्याने तक्रारदार श्री.वसावे लोकसेवक श्री.आमटे यांना भेटले.तेथुन तक्रारदार श्री.वसावे श्री. आमटे असे धुळेरोडावरील हॉटेल सागर येथे आले,त्यावेळी तक्रारदार यांनी श्री. आमटे यांचेशी त्यांच्या कामाबाबत चर्चा केली असता चर्चे दरम्यान श्री. आमटे यांनी तक्रारदार यांना सांगीतले की, तुमचे बिल मंजुर होवुन जाईल थोड तपासुन घेतो असे सांगुन किती देता..... दया ना पाच... पंचवीस हजार रुपये काय हरकत हे .... चेक ने दया व्यवस्थित किती देता असे सांगुन पुर्नियनच्या नावाने चेकच्या स्वरुपात २५,०००/–रु. लाचेची मागणी केली असे सांगितले.त्यानंतर आपण तक्रारदार यांना विचारता त्यांनी देखील वरीलप्रमाणे मिळती–जुळती हकीगत सांगितली.

त्यानंतर माझे व लोकसेवक श्री.आमटे यांचेतील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले. त्या संभाषणाची स्क्रिप्ट पोना/नावाडेकर यांनी माझे व पंच नं१ श्री.दाणे यांचे मदतीने अॅ.क.व्यु नंदुरबार कार्यालयात तयार केली.

त्यानंतर सदरचे मेमरीकार्ड एका लहान एक्स्टीकच्या कव्हरमध्ये ठेवून ते एका खाकी पाकीटात घालून त्यांवर पांढऱ्या कागदाचे लेबल लावून दोन्ही पंच व आपण सहया करून पाकीट लाखेने सिलबंद करुन ते आपण ताब्यात घेतले.

तसेच लोकसेविका श्रीमती गाढे हया दिनांक २२/०५/२०१९ रोजी मिळून न आल्याने तसेच त्यांनी देखील माझेकडेस यापूर्वी सदर प्रकरणात लावेची मागणी केली असलेबाबत मी माझे तक्रारीत नमुद केली असल्याने लोकसेविका श्रीमती गाढे मॅडम यांचेशी लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी सर्वानुमते कारवाई करण्याचे ठरविल्याने त्याबाबत तक्रारदार व पंच अशांना गोपनियता ठेवणेबाबत सुचना दिल्या असुन श्रीमती गाढे मॅडम यांचेशी तक्रारदार याचा संपर्क झालेवर त्या वोलवतील त्या दिवशी सदर पडताळणीची कारवाई करीत आहोत या संपूर्ण कारवाईचा पडताळणी पंचनामा करण्यांत आला होता.

त्यानंतर आपण दिनांक २२/०५/२०१९ रोजी दिलेल्या समजप्रमाणे मी व दोन्ही पंच असे दिनांक ०३/०६/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयात आम्ही आपले समक्ष हजर झालो.त्यावेळी कार्यालयात आपण आपला स्टाफ असे हजर होते.

त्यानंतर मी लोकसेविका श्रीमती गाढे मॅडम हया त्यांचे कार्यालयांत आलेल्या नाहीत बाबत माहीती काढल्याने मी,दोन्ही पंच,आपण आपला स्टाफ असे अॅन्टी कार्यालयांतच थांबुन होतो.

त्यानंतर दुपारी सुमारे १६.०० वा लोकसेविका श्रीमती गाढे मॅडम हया त्यांचे कार्यालयांत हजर आहेत बाबत माहीती समजुन आल्याने आपण पडताळणी कामी तयार झालो.

त्यानंतर आपण सांगितले की,लाचेचा सापळा कार्यवाही मध्ये सुरूवातीला पडताळणी करणे असल्याने आपण दिलेल्या सूचनेनुसार आपण पडताळणी कामी तयार झालो.

सॅनडिस्क मायक्रो एस.डी.–८ जी.बी.चे एक सीलबद मेमरी कार्ड बाहेर काढून आम्हा पंच व तक्रारदारासमक्ष हजर केले. सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर कसे हाताळण्यात येते याची सविस्तर माहिती आपण तक्रारदार श्री.वसावे व आम्हा पंचांना दिली. त्यासोबतच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर हाताळणीचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर आपण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालवून त्यामध्ये पूर्वीचे कसलेही रेकॉर्डींग नसल्याची आम्हा पंचांची खात्री केली. त्यानंतर आपण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले व आपल्या ताब्यात ठेवला आहे.

त्यानंतर आपण पंच नं२ श्री.वाघ याना सुचना दिली की, त्यांनी आपले सोबत राहुन पडताळणी कारवाईची पाहणी करावी. तक्रारदार व पंच नं. १ हे परत आल्यावर ते काय हकीगत सांगतात याकडेदेखील लक्ष देवुन ऐकाव.

त्यानंतर आपण, मी असे अॅ.क.व्युरो नंदुरबार कार्यालयातुन शासकीय वाहनाने १६.३० वाजता पंच व स्टाफसह रवाना होवुन नंदुरबार ग्राफ हायस्कुल जवळ वाहन उभे करून तेथुन आपण आपलेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टाचे आतील बनियानला लावून ते सुरु केले. ती वेळ १६:४५ वाजेची होती. त्यानंतर मला श्रीमती गाढे यांची भेट घेण्यासाठी पंच नं१ दाणे यांचेसह नंदुरबार शहरातील संजयनगर भागातील उपप्रादेशिक कार्यालय, येथे पायी–पायी रवाना केले.

थोडयाच वेळाने मी व पंच नं१ हे आपण थांबल्या ठिकाणी परत आले. तेव्हा आपण तक्रारदार याचे शर्टाचे आतील बनियानला लावलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बद करुन त्यांचे ताब्यात घेतले ती वेळ १६.५४ वाजेची होती.

त्यानंतर आपण पच नं१ श्री.दाणे यांना पंच नं.२ श्री.वाघ यांचेसमक्ष विचारले की, "आपणास व तक्रारदार अशांना नंदुरबार ग्राफ हायस्कुल जवळुन श्रीमती गाढे यांची भेट घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात रवाना केल्यापासून ते परत येईपावेतो काय काय घटना घडली? असे विचारता पंच नं१ यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार असे अॅ.क.व्युरो नंदुरबार कार्यालयातुन शासकीय वाहनाने निघुन नंदुरबार शहरात शिवाजी नाटयमंदिराजवळ वाहन उभे करून तेथुन मी व तक्रारदार वसावे असे पायी–पायी रवाना होवुन उपप्रादेशिक कार्यालय, आदिवासी विकास महामंडळ, संजयनगर, धुळे रोड, नंदुरबार या कार्यालयात तक्रारदार श्री.वसावे हे श्रीमती गाढे व श्री. आमटे यांची भेट घेण्यासाठी गेले असता लोकसेविका श्रीमती गाढे मॅडम हया धुळे रोड येथील कार्यालयात हजर मिळून आल्याने तक्रारदार श्री.वसावे लोकसेवक श्री.आमटे यांना भेटले. त्यावेळी चर्चेदरम्यान तक्रारदार यांनी श्रीमती गाढे मॅडम यांना सांगितले की, दिनांक २२/०५/२०१९ रोजी मी आपले कार्यालयातील लेखापाल श्री.आमटे यांना माझे वेतनाची फरकाचे बिलाविषयी चर्चा केली असता, त्यांनी मला सदर काम करुन देण्याचे मोवदल्यात २५,०००/–रुपये चेकने युनियन बॅकेच्या नावाने मागितला आहे बाबत सागितले. त्यावर तक्रारदार यांनी श्रीमती गाढे यांचेशी पुन्हा त्यांच्या कामाबाबत चर्चा केली असता चर्चे दरम्यान तक्रारदार याना श्रीमती गाढे यानी तक्रारदार यांना आमटे यांनी "किती सांगीतले"असे विचारुन तक्रारदार यांनी "पंचवीस हजार त्यांचे" असे सांगताच श्रीमती गाढे यानी हे पहा ...हा उदया यायच मात्र घेवुन ... मी प्रकरण तयार करायला लावते तुमचे ...तुम्हाला त्याचे सोबत काय दयायच ते दयायचं असे असे सांगुन त्यांनी, त्याचे स्वत:चे डावे हातावर २५,०००/–रुपये असे अक्षरी लिहुन सांगीतल. त्यानतर आपण तक्रारदार यांना विचारता त्यानी देखील वरील प्रमाणे मिळती–जुळती हकीगत सांगितली.

पंच नं१ श्री.दाणे याने मदतीने अॅ.क.व्यु नंदुरबार कार्यालयात तयार केली.

त्यानंतर सदरचे मेमरीकार्ड एका लहान एक्स्टीकच्या कव्हरमध्ये ठेवून ते एका खाकी पाकीटात घालून त्यांवर पांढऱ्या कागदाचे लेबल लावून दोन्ही पंच व आपण सहया करून पाकीट लाखेने सिलबंद करुन ते आपण ताब्यात घेतले.

तसेच मला २५०००/–रुपयांची जमवाजमव करणेसाठी एक दिवसाचा कालावधी लागणार असल्याने सदरची सापळा कारवाई ही दिनांक ०४/०६/२०१९ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविल्याने त्याबाबत मला व पंच अशांना गोपनियता ठेवणेबाबत सुचना दिल्या असुन दिनांक ०४/०६/२०१९ रोजी सदर सापळा कारवाई करण्याचे उरविण्यात आले.

त्यानंतर आपण दिलेल्या समजप्रमाणे मी व दोन्ही पंच असे दिनांक ०४/०६/२०१९ रोजी आपले कार्यालयात हजर झालो माझेकडुन तक्रारी दरम्यान केलेल्या लावेची मागणी प्रमाणे मी माझे क्रमांक सापाळ्यपुर्व पचनाम्यात नमुद करण्यात आले आहेत.

त्यानंतर आपण माझी दोन्ही पंचासमक्ष अंगझडती घेतली.त्यानंतर आपण लावेच्या सापळ्यकामी उपयोगात आणावयाची अंग्रासिन पावडर आणि अल्ट्राव्हायोलेट दिवा यांचा उपयोग आणि त्याचे लागलेली वस्तू किंवा मनुष्याच्या अवयवास अंग्रासन अल्ट्राव्हायोलेट दिव्याने प्रकाशात पाहिल्यास ज्या ठिकाणी अंग्रासिन पावडर लागलेली असते या ठिकाणी फिकट हिरवट रंगाची चकाकी दिसून येते. परंतु अंग्रासिन पावडर

आपल्या सूचनेवरुन पोहेकॉ/संजय गुमाने यानी बैगेतून एक सिलबंद पाकीट आणि एक दिवा काढून आपल्या समोर ठेवला. तेव्हा सदर दिवा हा अल्ट्राव्हायोलेट दिवा (यापुढे अ.व्हा.दिवा) आहे आणि सिलबद पाकीटात अंग्रासिन पावडरचीवाटली (यापुढे अ.पा.) असल्या बाबत आपण सागितले.त्यानंतर प्रथम नैसर्गिक प्रकाशात आणि त्यानंतर पोलीस उप अधीक्षक,"अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार यांचे कक्षाचे दरवाजे, खिडकी, इलेक्ट्रीक लाईट बंद करुन अंधारात अ.व्हा.दिव्याने प्रकाशात

पोहेकॉ/संजय गुमाने यांचे आपले आम्हां दोन्ही पंचाचे, आपल्या स्टाफचे असे सर्वांचे हात व कपडे आणि तक्रारदार यांनी लाच देणेकामी हजर केलेल्या नोटा तपासल्या. सर्व काही नैसर्गिक नेहमी प्रमाणे दिसून आले.

त्यानंतर आपल्या सूचनेवरुन पोहेकॉ/संजय गुमाने यांनी प्रात्यक्षिक करुन दाखवुन त्यांनी आपल्या सुचनेवरुन मी हजर केलेल्या २०००/ रुपये दराच्या १२ चलनी नोटांचा कागसाच्या बोळ्याने दोन्ही बाजुस क्रॉस आकाराची अ.पा.लावली. त्या नोटा प्रथम साध्या प्रकाशात दाखविल्या तेव्हा त्या चलनी नोटांवर काही एक चकाकी दिसुन आली नाही. पुन्हा कक्षाचे दरवाजे खिडक्या बंद करुन अंधारात त्या अ.पा.लावलेल्या नोटांवर अ.व्हा. दिव्याचा प्रकाश टाकुन दाखविला असता, त्या नोटांवर दोन्ही बाजुस क्रॉस आकाराची अ.पा.ची फिकट हिरवट चकाकी दिसुन आली. पुन्हा सदर कक्षामध्ये पुर्ववत उजेड करुन प्रकाशात आपल्या सुचनेवरुन पोहेकॉ/संजय गुमाने यांनी त्या अ.पा.लावलेल्या नोटा माझे पॅन्चे पुढील उजवे बाजूस असलेल्या खिशात ठेवल्या. त्यानंतर आपण पोहेकॉ/संजय गुमाने याना सापळ्या पार्टीतून बगळले. त्यानंतर आपण मला पंच नं.१व श्री. दाणे याना लाच देणेसबधी योग्य या सुचना दिल्यात तसेच पंच नं.२श्री. वाघ यांनाही योग्य या सुचना दिल्यात या संपूर्ण कावाईचा सापळ्यपुर्व पचनामा करण्यात आला होता.

त्यानंतर आपण, पच नं.२श्री.वाघ व आपला स्टाफ असे आपले शासकीय वाहनाने तसेच मी व पच नं.२ श्री. दाणे असे माझे खाजगी मोटार सायकलीवर असे अॅ.क.व्यु.नंदुरबार कार्यालयातुन निघुन नंदुरबार शहरा नायगाव रोडने नंदनवार शरणागत हॉटेल गोपीकमल जवळ ११.१५ वाजता पोहचला त्या ठिकाणी शासकीय वाहन आडोशाला उभे केले.

त्यानतर आपण डिजीटल व्हाईस रकॉर्डरमध्ये पचासमक्ष नवीन ४ जी.बी.चे कोरे मेमरी कार्ड टाकून व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनला आतील बाजूने लावून सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु केले. ती वेळ ११.४३ वाजेची होती.

त्यानंतर मी व पच नं१ श्री.दाणे यांना धुळे रोडावरील हॉटेल गोपीकमल जवळुन धुळे रोडजवळील उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार येथे लाचेची रक्कम देणेकामी हजर केलेल्या नोटा तसेच पोनि/सविना पाटील व स्टाफ असे थोडया अंतराने पायी रवाना झालेत.

त्यानंतर तक्रारदार मी व पच नं.१ श्री.दाणे असे श्रीमती गाढे यांचे धुळे रोडावरील उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार येथे गेलो असता आपण ,पंच नं. २ श्री.वाघ व आपला स्टाफ असे कार्यालयाच्या समोरील मोटार गॅरेज जवळ मोकळया जागेत थांबुन होते. त्यानंतर थोडयाच वेळात मी व पच नं. १ असे कार्यालयातुन निघुन बाहेर येवुन आपले शासकीय वाहन थांबले ठिकाणी आले. त्यावेळी आपण माझे शर्टाचे आतील बाजूस बनियनला लावण्यात आलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला.ती वेळ ११.५६ वाजेची होती.

त्यानतर आपण पंच नं१ श्री. दाणे यांना विचारले की, "धुळे रोडावरील हॉटेल गोपीकमल जवळुन धुळे रोडजवळील उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार येथे तक्रारदार सोबत पायी रवाना केले पासून ते परत [illegible] तक्रारदाराकडून कोणी पैसे घेतल्या व कोणे पैसे घेतल्या आहेत? असे विचारता पच नं१ श्री.दाणे यांनी सांगितले की,मी व तक्रारदार श्री. वसावे असे धुळे रोडावरुन धुळे रोडावरुन धुळे रोडावरुन धुळे रोडावरील हॉटेल गोपीकमल जवळुन पायी–पायी हॉटेल,तेथुन तक्रारदार श्री.वसावे श्री. आमटे असे धुळेरोडावरील हॉटेल सागर येथे आले,त्यावेळी तक्रारदार यांनी श्री. आमटे यांचेशी त्यांच्या कामाबाबत चर्चा केली असता चर्चे दरम्यान श्री. आमटे यांनी तक्रारदार यांना सांगीतले की, तुमचे बिल मंजुर होवुन जाईल थोड तपासुन घेतो असे सांगुन किती देता..... दया ना पाच... पंचवीस हजार रुपये काय हरकत हे .... चेक ने दया व्यवस्थित किती देता असे सांगुन पुर्नियनच्या नावाने चेकच्या स्वरुपात २५,०००/–रु. लाचेची मागणी केली असे सांगितले.त्यानंतर आपण तक्रारदार यांना विचारता त्यांनी देखील वरीलप्रमाणे मिळती–जुळती हकीगत सांगितली.

त्यानंतर माझे व लोकसेवक श्री.आमटे यांचेतील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले. त्या संभाषणाची स्क्रिप्ट पोना/नावाडेकर यांनी माझे व दोन्ही पंचांचे मदतीने कार्यालयातच तयार केली.

त्यानंतर आपल्या सूचनेवरुन पोना/नावाडेकर यांनी माझे व श्रीमती गाढे मॅडम यांचेत ध्वनिमुद्रीत झालेले नमूद संभाषणाचे मेमरी कार्ड डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधून काढून त्याचे फोल्डर नं१ मधील हॅश व्हॅल्यू काढून, हॅश व्हॅल्यू सर्टीफीकेटवर दोन्ही पंचांनी व आपण सह्या करून कागदपत्रात समाविष्ठ केले.

सदरचे मेमरीकार्ड एका लहान एक्स्टीकच्या कव्हरमध्ये ठेवून ते एका खाकी पाकीटात घालून पाकीटावर " तक्रारदार श्री.वसावे यांचे व श्रीमती गाढे मॅडम यांचेतील दिनांक ०४/०६/२०१८ रोजीचे सापळा स्थगीती पचनामाबाबतचे संभाषण" असे इकलिखीत केलेला पाढऱ्या कागदाचे लेबल लावून त्यावर आम्ही पंच व आपण सहया करून खाकी पाकीट लाखेने सिलबंद करण्यात आले ते आपण ताब्यात घेतले.

तसेच सापळ्या कारवाईकामी सोबत घेण्यांत आलेल्या लाचेच्या रक्कमेचे पाकीट आम्हा पंचासमक्ष पोह/महाजन यांनी आपले सुचनेवरुन जप्त करुन ते एक मोठया खाकी पाकीटामध्ये टाकुन सदरचे पाकीट सिलबंद करुन त्यावर आपण व आम्ही पंचांनी सहया करुन सरदचे पाकीट आपण तपासकामी ताब्यात घेतले.

त्यानंतर आपण ,पच नं.२ वाघ व सापळ्या पथकातील अधिकारी व कर्मचारी असे सर्वजण धुळे रोडाजवळील उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार जवळुन शासकीय वाहनाने निघुन तसेच मी व पंच नं.१ असे माझ्या खाजगी मोटार सायकलीने निघुन सर्वजण संजयनगर मधिल उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार कार्यालयांजवळ येवुन सदर कार्यालयाचे समोर असलेल्या मारोती मंदीराजवळ असलेल्या सभागृहात थांबुन होतो.

त्यानंतर दुपारी १२.०० वाजेपासुन ते १५.०० वाजेपावेतो आपण सर्वजण संजयनगर मधिल उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार कार्यालयासमोरील मारोती मंदीराजवळ असलेल्या सभागृहात थांबुन होतो तसेच लोकमेसेविका श्रीमती गाढे मॅडम हया कार्यालयात आल्यास नाहीत व त्यांनी माझेशी कोणत्याही प्रकारे संपर्क साधला नाही.

आपण मला श्रीमती गाढे मॅडम यांचेशी सदर लाचेची रक्कम देणेसबंधी धुळे रोडावरील उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार येथे पाठविले असता सदर रक्कम स्विकारणेस श्रीमती गाढे मॅडम यांनी टाळाटाळ केली व मला संजयनगर मधिल उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार येथे थांबण्यास सांगुन दुपारी १२.०० वाजेपासुन ते १५.०० वाजेपावेतो त्या संजयनगर मधिल उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार येथे आल्याच नाहीत व कोणत्याही प्रकारचा माझेशी संपर्क केला नाही.यावरुन माझे यांचे सांगणे की, आता माझ्याकडुन श्रीमती गाढे मॅडम हया सदर लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत तसेच कोणताही प्रतिसाद पुन्हा देणार नाही बाबत माझी व दोन्ही पचांची तसेच आपली खात्री झाल्याने सदरची सापळ्य कारवाई ही सर्वानुमते स्थगीत करण्यांत आली.

त्यानंतर आपण मला व पंचांना गोपनियता राखण्याबाबत योग्य या सुचना देवुन रवाना केले.

त्याबाबतचा सविस्तर सापळ्य स्थगीती पंचनामा दिनांक ०४/०६/२०१९ रोजी करण्यांत आला आहे.

एकंदरीत दिनांक ०४/०६/२०१९ रोजी लोकसेविका श्रीमती गाढे मॅडम यांनी सदर लाचेची रक्कम देणेसाठी मी धुळे रोडावरील उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार येथे गेलो असता सदर रक्कम स्विकारणेस लोकसेविका श्रीमती गाढे मॅडम यांनी टाळाटाळ केली व त्यावेळी त्यांनी मी फोन करते तुम्हाला व तिकडच्या ऑफीसला थांबा असे सांगुन मला संजयनगर मधिल उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार येथे [illegible] संजयनगर मधिल उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार येथे आल्याच नाहीत व कोणत्याही प्रकारचा माझेशी संपर्क केला नाही. तसेच लोकसेवक श्री. आमटे यानी मागणी केलेले चेकने २५,०००/–रुपये देण्यासाठी वेळोवेळी गेलो असता त्यानी आजपावेतो मला सांगितले की,मी नाशिकला आहे मी बाहेर आहे,मी धडगांवला आहे असे सांगुन त्यांनी मागणी केलेली चेकने लाचेची रक्कम घेण्यावी टाळाटाळ केली,त्यावाबत माझे सांगणे की, आता माझ्याकडुन १)लोकसेविका श्रीमती गाढे मॅडम व २)लोकसेवक श्री.आमटे हे सदर लाचेची रक्कम व चेक स्विकारणार नाहीत व कोणताही प्रतिसाद पुन्हा देणार नाही बाबत माझी खात्री झाली असुन त्यावरुन मला असे वाटते की वरील दोन्ही लोकसेवक हे आता माझेकडुन पैसे घेणार नाहीत.

तरी लोकसेविका १)श्रीमती किरण बाळु गाढे उपप्रादेशिक व्यवस्थापक, व लोकसेवक २)संतोष बहादुर आमटे लेखापाल दोन्ही नेम. उपप्रादेशिक कार्यालय, नंदुरबार यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेशीर मागनि स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी लोकसेविका १) श्रीमती किरण बालु गाढे यांनी २५,०००/–रुपये रोखीने व २)संतोष बहादुर आमटे यांनी सुनियन्च्या नावाने बॅक चेकने २५,०००/–रुपये त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारण्यास टाळाटाळ केली. म्हणुन त्यांचे विरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचून पाहिली. ती माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉप संगणकावर बरोबर टाईप केली आहे.

Scanned by CamScanner